## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 1981

## THE CODE OF CRIMINAL PROCEDURE (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1981

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक, २० मे १९८१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. जी. मुझुमदार,**
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 1981

## AN ACT FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २६ मे १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४

### फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ही, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ही, महाराष्ट्र राज्यास लागू असताना तिच्यात, यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, आणखी सुधारणा करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

१९७४ चा २. **२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, ही महाराष्ट्र राज्यास लागू असताना तिच्या, कलम २४ मध्ये,— सन १९७४ चा अधिनियम २ याच्या कलम २४ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "त्या उच्च न्यायालयाचा विचार घेतल्यानंतर" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ब) पोट-कलम (४) मध्ये, "सत्र न्यायाधीशाचा विचार घेऊन" या मजकुराऐवजी "राज्य शासनाची मान्यता घेऊन" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.